**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः18.09.2025** **वारःगुरुवार**

---

- **पंतप्रधानांच्या हस्ते स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाचं उद्घाटन**
- **देशासह राज्यात सेवा पंधरवड्याचा प्रारंभ, येत्या 1 मे पर्यंत राज्य शासनाच्या 11शे सेवा डिजिटल पद्धतीनं उपलब्ध होणार**
- **मराठवाड्याच्या विकासासाठी सर्वच क्षेत्रात अथक प्रयत्न करण्याचं मुख्यमंत्र्यांचं मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनी आवाहन**
- **आणि**
- **ज्येष्ठ इतिहास संशोधक, शिवचरित्रकार गजानन भास्कर मेहेंदळे यांचं पुण्यात निधन**

आता सविस्तर बातम्या,

पंतप्रधान-स्वस्थनारी अभियान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल मध्य प्रदेशात धार इथं स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाचं उद्घाटन झालं. अभियानादरम्यान आयोजित केलेल्या आरोग्य

शिबिरांचा लाभ घेऊन आपली आरोग्य तपासणी करुन घ्या असं आवाहन पंतप्रधानांनी यावेळी महिलांना केलं.

बाइट

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत मुंबईत या अभियानाची राज्यस्तरीय सुरुवात झाली. या अभियानाचं पुणे जिल्हास्तरीय उद्धाटन खासदार सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत बारामती इथं झालं. विविध जिल्ह्यांमधल्या ग्रामीण रुग्णालयातही या अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. या अभियाना अंतर्गत महिलांसाठी रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, एचआयव्ही, क्षयरोग, सिकल सेल इत्यादी तपासण्या केल्या जाणार आहेत, तसंच अंगणवाडी स्तरावर पूरक आहार आणि पोषणासंदर्भात विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.

**सेवापंधरवडा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनाचं औचित्य साधून देशात कालपासून सेवा पंधरवड्याचा प्रारंभ करण्यात आला. महात्मा गांधी जयंतीपर्यंत म्हणजेच येत्या 2 ऑक्टोबरपर्यंत देशभरात ठिकठिकाणी सेवा पंधरवड्यानिमित्त वेगवेगळे उपक्रम राबवले जाणार आहेत. राज्यातल्या सेवा पंधरवड्याचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुण्यात करण्यात आला. सामान्य माणसाचं जीवन अधिक सुलभ करण्यासाठी सेवा हमी कायद्या अंतर्गत अकराशे सेवा येत्या 1 मेपर्यंत डिजीटल पद्धतीनं उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर

बावनकुळे, खासदार मेधा कुलकर्णी, अभिनेते नाना पाटेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 75व्या वाढदिवसानिमित्त पर्यटन विभागामार्फत राज्यातल्या साडे सात हजार तरुणांना प्रशिक्षण देण्याचा ‘नमो पर्यटन कौशल्य कार्यक्रम’, तसंच कौशल्य विकास विभागाच्या वतीने स्वच्छता अभियानही राबवण्यात आलं.

केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यातर्फे पुण्यात स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या, ‘ज्योतीने तेजाची आरती’ या ड्रोन शोद्वारे पुणेकरांच्या वतीने पंतप्रधान मोदींना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. पुण्यातल्या अन्य एका कार्यक्रमात साडेसात हजार विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची सामूहिक शपथ घेतली. नवी मुंबईत वाशी इथं वृक्षारोपण करुन सेवा पंधरवड्याचा प्रारंभ करण्यात आला. राज्यातल्या अन्य शहरांमध्येही सेवा पंधरवड्यानिमित्त स्वच्छता अभियान राबवण्यात आलं.

**कॅप्सूल कृषीक्षेत्रप्रगती**

सेवा आणि सुशासनाचा मार्ग अवलंबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार देशाच्या सर्व समावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. सरकारच्या प्रयत्नांमुळे कृषी क्षेत्रात सुधारणा होत असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होत आहे. ऐकूया याबाबतचा वृत्तांत,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील कृषी क्षेत्राचं  क्षितिज आणखी विस्तारत आहे. शेतीपूरक विविध उद्योगांच्या माध्यमातून ग्रामीण कुटुंबांना उत्पन्नाचे नवे स्त्रोत उपलब्ध होत असून त्यांचं भविष्य सुरक्षित होण्यासाठी हे कृषी आधारित उद्योग सहाय्यभूत ठरत आहेत, या संदर्भात स्वातंत्र्यदिनी केलेल्या भाषणात पंतप्रधान मोदी म्हणाले ...........

**बाइट मोदी**

धान्य पिकांबरोबरच फळे, भाजीपाला, मसाले, दुध आणि दुग्धजन्य पदार्थ , मत्स्यउत्पादन , पशुपालन यासारख्या शेतीपूरक उद्योगांना केंद्र सरकारने दिलेलं पाठबळ शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे......

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.

**मराठवाडामुक्ती संग्रामदिन**

मराठवाड्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी उद्योग, रोजगार निर्मिती, कृषि, पायाभूत सुविधा विकास अशा सर्व क्षेत्रात अथकपणे काम करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगरमधल्या मराठवाडा मुक्तिसंग्राम स्मृतिस्तंभाच्या ठिकाणी काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. मराठवाड्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्वांना राज्य सरकारच्या वतीनं तत्काळ मदत देण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली. बीडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करुन

ध्वजारोहण करण्यात आलं. मराठवाड्याच्या स्वातंत्र्यलढ्यात आपले प्राण अर्पण करणाऱ्या शूरवीरांचं योगदान अमूल्य आहे असं पवार यावेळी म्हणाले. मराठवाड्यातील अन्य जिल्ह्यांमध्येही मुक्तीसंग्राम दिनानिमित्त ध्वजवंदन आणि अन्य कार्यक्रम काल झाले.

अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ ब्रॉडगेज रेल्वे प्रकल्पाच्या अंमळनेर ते बीड या टप्प्याचं उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेसेवेचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल झाला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात फुलंब्री तालुक्यातल्या किनगाव इथं मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा राज्यस्तरीय प्रारंभही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला. राज्यातल्या सर्व ग्रामपंचायतींमध्ये 31 डिसेंबरपर्यंत हे अभियान राबवलं जाणार आहे. या अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींना कोट्यवधींच्या बक्षिसांनी गौरवलं जाणार आहे. राज्यातील एक कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवू, असा संकल्प मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

**वस्तूसेवाकर**

केंद्र सरकारनं जाहीर केलेल्या वस्तू आणि सेवा कर सुधारणा येत्या 22 तारखेपासून अमलात येणार आहेत. यामध्ये वाहनं आणि त्यांचे सुटे भाग

यांच्यावरचा कर कमी करण्यात आला आहे. याचा फायदा सणासुदीच्या काळात ग्राहकांना होणार असल्याचं सांगताना पुण्याचे राहुल कुलकर्णी म्हणाले,

बाइट

**नक्षलीठार**

गडचिरोली जिल्ह्यातल्या एटापल्ली तालुक्यात मोडस्के जंगलात काल दुपारी झालेल्या चकमकीत पोलिसांनी दोन नक्षली महिलांना ठार केलं. पोलिसांनी घटनास्थळावरुन स्वयंचलित रायफलीसह मोठ्या प्रमाणावर दारुगोळा आणि अन्य साहित्य ताब्यात घेतलं आहे.

**निधन**

ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि शिवचरित्रकार गजानन भास्कर मेहेंदळे यांचं काल पुण्यात हृदयविकाराच्या तीव्र झटक्यानं निधन झालं; ते 78 वर्षांचे होते. गेली 50 वर्षे इतिहास संशोधनाच्या कार्याला वाहून घेणारे गजानन मेहेंदळे, शिवचरित्राबरोबरच युद्ध इतिहासाचेही गाढे अभ्यासक होते. फारसी, मोडी, इंग्लिश, फ्रेंच, जर्मन अशा विविध भाषांवर त्यांचं प्रभुत्व होतं. छत्रपती शिवाजी महाराज झाले नसते तर, शिवाजी- हीज लाईफ अँड टाईम्स, मराठ्यांचे आरमार अशा अनेक पुस्तकांचं लेखन त्यांनी केलं. पुण्यातील भांडारकर संशोधन संस्था, भारत इतिहास संशोधक मंडळ यासह अन्य विविध संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. त्यांचं पार्थिव आज सकाळी 11 वाजता भारत इतिहास संशोधक मंडळात

अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येईल, त्यानंतर वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या महिला क्रिकेट संघांदरम्यान चंदीगड इथं झालेल्या मर्यादित षटकांच्या दुसऱ्या क्रिकेट सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियाचा 102 धावांनी पराभव केला. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या या मालिकेत 1-1 अशी बरोबरी साधली आहे. प्रथम फलंदाजी करताना भारतानं 292 धावा केल्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलिया संघ 190 धावाच करु शकला. स्मृती मानधानाने 91 चेंडूत 117 धावा केल्या.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्याच्या सर्वच विभागात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या,**

- **पंतप्रधानांच्या हस्ते स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाचं उद्घाटन**
- **देशासह राज्यात सेवा पंधरवड्याचा प्रारंभ, येत्या 1 मे पर्यंत राज्य शासनाच्या 11शे सेवा डिजिटल पद्धतीनं उपलब्ध होणार**

- मराठवाड्याच्या विकासासाठी सर्वच क्षेत्रात अथक प्रयत्न करण्याचं मुख्यमंत्र्यांचं मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनी आवाहन

आणि

- ज्येष्ठ इतिहास संशोधक, शिवचरित्रकार गजानन भास्कर मेहेंदळे यांचं पुण्यात निधन

# आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.